# -: UGC-MPSC & UPSC प्रशिक्षण २०१८-१९ प्रवेश प्रक्रीयेसंबंधी सुचना :-

1) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्रामार्फत रविवार दि. १५ जुलै,२०१८ रोजी घेतलेल्या प्रवेश परीक्षेच्या दि. १ सप्टेंबर २०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या गुणवत्ता यादीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी सोमवार दि. ०३ सप्टेंबर, २०१८ ते शनिवार दि. ०८ सप्टेंबर २०१८ पर्यंतच स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये व्यक्तीशः हजर राहुन प्रवेश प्रक्रीया पूर्ण करावी.

2) विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रीयेदरम्यान मुळ कागदपत्रे **(Original Documents)** व त्यांच्या २-छायांकीत प्रती पडताळणीसाठी स्पर्धा परीक्षा केंद्र कार्यालयामध्ये सकाळी ११:०० ते सायं ०५:०० (जेवणाची वेळ वगळता) सादर करावीत. सदर प्रवेश हा वैध कागदपत्रांवर आधारीत असून यामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी आढळल्यास प्रवेश देण्यात येणार नाही.

3) वर नमूद कालावधीमध्ये प्रवेश न घेतल्यास अथवा कोणत्याही प्रकारे संपर्क न साधल्यास निवड यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी विचारात घेतले जाणार नाही व प्रतिक्षा यादीतील पुढील विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस गुणवत्ता यादीनुसार प्रवेश देण्यात येईल.

4) रिक्त जागांच्या उपलब्धतेनुसार प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारांची प्रवेश प्रक्रिया मंगळवार दि. ११ सप्टेंबर,२०१८ ते शनिवार दि. १५ सप्टेंबर २०१८ दरम्यान राबविली जाईल.

5) खुल्या प्रवर्गातून प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण हे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजने अंतर्गत येत नसून स्वयंनिर्वाही **(Self Supported)** असल्याकारणे या मधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी जाहीरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रशिक्षण शुल्क रू. ३०,०००/- (तीस हजार) तसेच रू. २०००/- (दोन हजार रुपये) सुरक्षा रक्कम **(Caution Money)** प्रवेश घेते वेळी चलनाव्दारे भरणे अनिवार्य आहे.

6) स्वयंनिर्वाही **(Self Supported)** विद्यार्थी/विद्यार्थीनी वगळता ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ अनुदान आयोग (**UGC**) प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ यापूर्वी दोनवेळा घेतलेला आहे, अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार **(UGC Guidelines)** या योजनेअंतर्गत प्रवेश मिळणार नाही. त्याऐवजी प्रतिक्षा यादीतील पुढील विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस गुणवत्ता यादीनुसार प्रवेश देण्यात येईल परंतु सदर लाभार्थ्याने जर खुल्या प्रवर्गातून अर्ज केला असल्यास ते स्वयंनिर्वाही तत्वानुसार (गुणवत्ता यादीनुसार) प्रवेशास पात्र राहतील.

7) प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी रू. २०००/- (अक्षरी दोन हजार रुपये) सुरक्षा रक्कम **(Caution Money)** चलनाव्दारे भरणे अनिवार्य आहे. सदर रक्कम प्रशिक्षण कार्यक्रमाअंती, **No Dues** स्पर्धा परीक्षा केंद्र कार्यालयास सादर केल्यानंतर परत देण्यात येईल.

8) सर्व विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यामध्ये हमीपत्र भरुन देणे अनिवार्य आहे.


संपर्क :-<br>
स्पर्धा परीक्षा केंद्र,<br>
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,<br>
गणेशखिंड, पुणे. ४११००७.<br>
ई-मेल :- cec@unipune.ac.in